जन-२३६-४०० - (२)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## ज्ञाप-परिपत्रक

**२००९-१०**

**क्रमांक : सा.प्र.वि./उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष २१ दिनांक १८.०९.२००९**

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी यांना पाचव्या वेतन आयोगातील शिफारशींनुसार सुधारित वेतनश्रेणीपोटी थकबाकी देण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/२६ दिनांक २९.११.२००८.

--------

महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकारी यांना पाचव्या वेतन आयोगातील शिफारशींनुसार सुधारित वेतनश्रेणी १.१.१९९६ पासून काल्पनिकरित्या लागू करण्यात आल्या असून प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी २००९ पासून करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्ष थकबाकी दि.१.४.२००५ पासून द्यावयाची आहे.

दि.१.१.२००६ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी आणि भत्ते लागू करण्याबाबतच्या सूचना नंतर प्रसृत करण्यात येतील. वर नमूद केल्याप्रमाणे दि.१.४.२००५ ते ३१.१२.२००५ या कालावधीकरिता प्रत्यक्ष थकबाकीपोटी सरसकट रु.४०,०००/- इतकी आगाऊ रक्कम सर्व वैद्यकीय अधिका-यांना अधिदान करावयाची आहे.

त्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत :-

१) थकबाकीची वरील आगाऊ रक्कम अधिका-यांच्या बँक खाती ई.सी.एस. द्वारे माहे सप्टेंबर २००९ च्या वेतनाबरोबर जमा करण्यात येईल. त्यासाठी खात्यांनी कोणत्याही प्रकारची आधारसामग्री सादर करावयाची आवश्यकता नाही.

२) सदर आगाऊ रक्कम दि.१.४.२००५ ते ३१.१२.२००५ या काळात नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना यथाप्रमाणे अनुज्ञेय होईल. मात्र, दि.१.१.२००६ नंतर नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना ही रक्कम अनुज्ञेय नाही.

३) ही आगाऊ रक्कम उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकातील क्र.१६ येथील सूचनेनुसार देय होणा-या अंतिम थकबाकीतून वळती करण्यात येईल.

४) आगाऊ रक्कम चालू वित्तिय वर्षाच्या आयकर परिगणनेसाठी विचारात घेण्यात यावी. परंतु व्यवसाय करासह अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ विचारात घेऊ नये.

५) सदर थकबाकीपोटी करावयाचा खर्च आर्थिक वर्ष २००९-१० मधील संबंधित अर्थसंकल्पीय आस्थापना तरतूदीतून भागविण्यात यावा.

सर्व अधिष्ठाता व कार्यकारी आरोग्य अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आस्थापना कर्मचा-यांना वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

| | | |
|---|---|---|
| सही/- वि.शि.धायगुडे | सही/- राम धस | सही/-राजेंद्र वळे |
| १६.०९.२००९ | १६.०९.२००९ | १८.०९.२००९ |
| उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) | प्रमुख लेखापाल (वित्त) | उपायुक्त (सा.प्र.) |

ज्ञाप- परिपत्रक

२००९-१०

क्रमांक : सा.प्र.वि./उप प्र.ले.(आस्था.२)/वेसुकक्ष/२१ दिनांक १८.०९.२००९

————————— यांना प्रत (——— जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) यांजकरिता

cbsD:\copy c\Revision Grade\Cir reg Arrears & payscales of Med Off.doc9/18/2009